# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

सीआयएनः U45200MH1974SGC017206

कार्यालय :–महाव्यवस्थापक, नागपूर प्रदेश, नागपूर

एफडीसीएम भवन 359/B हिंगणारोड, अंबाझरी, नागपूर– 440 036

ई–मेल–rmngp328@gmail.com दुरध्वनी क्रमांक : (O) 0712-2811901 वेबसाईट : www.fdcm.nic.in

क्रमांक : एफडीसीएम/महाव्यनाप्र/आस्था/प्र.क्र.726/2895 नागपूर, दिनांक : 29 DEC 2022

## कार्यालयीन आदेश

विषय : वनरक्षक यांना वनपाल संवर्गात पदोन्नती व पदस्थापना करणेबाबत.

विषयांकित प्रकरणी खालील वनरक्षक यांना वनपाल संवर्गात वेतन बॅड एस–8 वेतन संरचना रुपये 25500–81100 मधील वेतनश्रेणीत (सातवे वेतन आयोगाप्रमाणे) पदोन्नती देण्यांत येत आहे. शासन निर्णय क्रमांक बीबीसी –2018/प्र.क्र. 366/16 ब दि.07/05/2021 मधील तरतुदीनुसार वनपाल पदावर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विभागात पदोन्नतीनंतर पदस्थापना करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | पदोन्नती करण्यांत आलेल्या वनरक्षकांचे नांव | पदोन्नतीचा प्रवर्ग | सद्या कार्यरत विभागाचे नांव | पदोन्नती नंतर पदस्थापना करण्यात आलेल्या पद व विभागाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री व्ही.व्ही.तेजनकर | खुला | वन प्रकल्प विभाग, यवतमाळ | कुसुममोरी राऊंड, हिवरा परिक्षेत्र वन प्रकल्प विभाग, नागपूर | |

उपरोक्त नमुद वनरक्षक यांना वनपाल या पदावर पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे.

1. उक्त पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017 च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहतील.
2. "वनरक्षकांचे सेवाजेष्ठता व पदोन्नती बाबत मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे विचाराधीन असलेल्या रिट याचिका क्रमांक 8543/2019 व रिट याचिका क्रमांक 1892/2020 चे मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांचे अधिन राहून रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खुल्या प्रवर्गात देण्यात येत आहे."
3. व्यवस्थापकीय संचालक, नागपूर यांचे पत्र क्रमांक प्रशा/आस्था/2499 दिनांक 09/09/2011 अन्वये एफडीसीएम लिमी. मधील वनपाल संवर्गाच्या सुधारित सेवाभरती नियमातील सर्व अटी व शर्ती संबंधितांना बंधनकारक राहतील.

(ऋषिकेश रंजन)
महाव्यवस्थापक,
नागपूर प्रदेश, नागपूर

प्रति,
श्री व्ही.व्ही.तेजनकर, वनरक्षक
मार्फत : विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, यवतमाळ

प्रतिलीपी : व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमी., नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी : विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, ~~यवतमाळ~~/ नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांनी संबंधीत वनरक्षक यांना स्थानिक व्यवस्था करुन त्वरीत कार्यमुक्त करावे व कार्यमुक्त झालेल्या वनरक्षकांना वनपाल पदावर रुजू करुन घ्यावे. तसेच कार्यमुक्त/रुजू केल्याचा अहवाल यथावकाश या कार्यालयास सादर करावा.

प्रतिलीपी : आदेश फाईल.